महाराष्ट्र शासन
विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, लातूर.
Vilasrao Deshmukh Government Medical College, Latur.
(Office of the Dean)
Phone No./Fax No. :- 02382-253017.
Website: vdgmclatur.org Email :- dean_gmcl@rediffmail.com

जा.क्र.विदेशावैमला/विद्याशाखा/पी.जी./कनि/ 6669-72/२०२६, दिनांक:- 05.०८.२०२६.

# जाहिरात

शासन निर्णय क्र.एमईडी-३२०२/सीआर-२२१/ ०२/शिक्षण-२ दिनांक: २१ जून २००५ अन्वये विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, लातूर येथील खालील प्रमाणे कनिष्ठ निवासी संवर्गातील रिक्त पद निवड समितीमार्फत तात्पुरत्या स्वरुपात भरण्यासाठी अहर्ताप्राप्त पात्र उमेदवाराकडून विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यांत येत आहेत.अर्ज करतेवेळी उमेदवार शासकीय/अशासकीय सेवेत कार्यरत असल्यास त्यांनी अर्ज विहीत मार्गाने व विहीत नमुन्यात सादर करावा. अन्यथा त्यांच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. या पुर्वी सादर केलेल्या अर्जावार विचार केला जाणार नाही. कनिष्ठ निवासीचे पदे विभागानुसार खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | विभागानुसार रिक्त पदे | रिक्त पदे |
|---|---|---|
| ०१ | दंतशास्त्र विभाग | 01 |
| | एकुण रिक्त पदे | **01** |

**शैक्षणिक अर्हता :-** कनिष्ठ निवासी:- बी.डी.एस. पदवी तसेच महाराष्ट्र राज्य दंत परिषदची (MSDC) बी.डी.एस. नोंदणी आवश्यक आहे.

**वेतनः-** कनिष्ठ निवासी- मुळ वेतन व त्यावरील प्रचलित दराने देय होणारा महागाई भत्ता असे ठोक (एकत्रित) मानधन अनुज्ञेय राहील.

**वयोमर्यादा:-** वय ४५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

| | | |
|---|---|---|
| १ | अर्ज विक्रीचा दिनांक | दि.०६.०८.२०२६ ते दि. १४.०८.२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत |
| २ | अर्ज स्वीकारण्याचा अंतिम दिनांक | दि. १४.०८.२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत |

**मुलाखतीचा दिनांक पुढील आदेशाद्वारे जाहिर करण्यात येईल.**

**अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे/प्रमाणपत्रे:-**

अर्जासोबत खालील प्रमाणपंत्राच्या साक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे. अन्यथा अर्जाचा विचार केला जाणार नाही. नंतर कोणतेही कागदपत्रे स्विकारली जाणार नाहीत.

०१.प्रथम,द्वितीय,तृतीय व चतुर्थ बिडीएस गुणपत्रिका ०२. बिडीएस उत्तीर्ण प्रमाणपत्र ०३. बिडीएस पदवी प्रमाणपत्र ०४. प्रयत्न प्रमाणपत्र. ०५. अंतरवासीता प्रमाणपत्र (Internship Completion Certificate) ०६ महाराष्ट्र राज्य दंत परिषदची (MSDC) बी.डी.एस. नोंदणी प्रमाणपत्र. ०७. अनुभव प्रमाणपत्र.०८.जन्म तारखेकरीता एसएससी प्रमाणपत्र. ०९. आधार कार्ड झेरॉक्स.

कनिष्ठ निवासी पदाकरिता उमेदवारांची नियुक्ती अस्थाई स्वरुपाची राहील, व उमेदवाराचे काम समाधानकारक नसल्यास कोणतीही पुर्वसुचना न देता सेवा समाप्त करण्यात येईल. रुजु होतवेळेस रु.१००००/- (अनामत रक्कम) जमा करावे लागेल व पुर्व सुचना न देता राजीनामा दिल्यास अनामत रक्कम मिळणार नाही.

**गुणवत्ता यादी खालील निकषानुसार तयार करण्यात येईल.**

१. प्रथम, द्वितीय, तृतीय व चतुर्थ वर्षामधील बिडीएस एकुण गुण/टक्केवारी. जर समान गुण असल्यास जुन्या प्रवेश बॅच च्या उमेदवाराला प्राधान्य दिले जाईल. तरीही बरोबरी कायम राहिल्यास जन्मतारखे नूसार वयस्कर उमेदवाराला प्राधान्य दिले जाईल.

२. महाराष्ट्रातील दंत महाविद्यालयातून उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

अर्जासोबत खालील प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे अन्यथा अर्जाचा विचार केला जाणार

Scanned with OKEN Scanner

३. तदनंतर इतर राज्यातील दंत महाविद्यालयातून उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

नोट :-

०१.पात्र उमेदवारांची प्रतिक्षा यादी (Waiting List) तयार करण्यात येईल. ही प्रतिक्षा यादी (Waiting List) पुढील ६ महिन्यांपर्यंत वैध असेल. या काळात दंतशास्त्र विभागातील इतर तत्सम पद रिक्त राहिल्यास , त्या पदावर प्रतिक्षा यादी (Waiting List) मधील उमेदवारांचा नियुक्तीसाठीचा विचार केला जाईल.

०२.यापुर्वी या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे काम करीत असताना आपले काम असमाधानकारक असल्यामुळे जर आपली नियुक्ती रद्द केली असल्यास आपल्या अर्जाचा विचार करण्यांत येणार नाही.

०३.वरील जाहिरातीमधील पदांच्या संख्येत कमी/अधिक करण्याचा तसेच निवड समिती मार्फत निवड झालेल्या उमेदवाराचे नियुक्ती आदेश निर्गमीत करण्याचा अथवा प्रलंबीत ठेवण्याचा अथवा नियुक्ती रद्द करण्याचा अथवा सदर जाहिरात रद्द करण्याचा अधिकार अधिष्ठाता यांच्याकडे राखुन ठेवण्यांत येत आहे.

Vilasrao Deshmukh Government Medical College, Latur

अधिष्ठाता,
विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय
महाविद्यालय, लातूर.

प्रत:-

१. मा.आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन,मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. अधिष्ठाता, शासकीय दंत महाविद्यालय,.......
३. प्राध्यापक व विभाग प्रमुख,......................विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,लातूर
४. सुचना फलक, विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,लातूर

Scanned with OKEN Scanner